# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०१

## <u>प्रसिध्दीपत्रक</u>

## <u>स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अॅण्ड स्टुडंटस् परीक्षा</u> <u>(GCC-SSD-CTC) मार्च -२०२३ अंतरिम निकाल.</u>

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अॅण्ड स्टुडंटस् परीक्षा (GCC-SSD-CTC) मार्च-२०२३ दिनांक ०५/०३/२०२३ रोजी परीक्षा राज्यातील ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली.

सदर परीक्षेचा अंतरिम निकाल दिनांक २१/०४/२०२३ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे.या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.विद्यार्थ्यांना गुणपत्रकांची ऑनालाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, (सर्व) व मुंबईसाठी शिक्षण निरीक्षक (उ./द./प.) मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे /गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाणे व छायाप्रतीसाठी मिळण्यासाठी प्रति विषय रूपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक ०२/०४/२०२३ पर्यंत भरण्यात यावी. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| GCC-SSD-CTC (इंग्रजी) | ११९२ | १०८१ | ७८ | ६०० | २७१ | २४३ | ५५.५०% |

21.4.2023

(शैलजा दराडे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१